कोर्ट विद्यमान श्रीमती उषा चौधरी, तहसीलदार, ब्रम्हपुरी यांचे कार्यालय

रा.मा.क्रं.26/एन.ए.पी.34/2021-2022

मौजा:- **खरबी** तालुका:- **ब्रम्हपुरी**

**EQJ Court No. 00051/2022**

## आदेश

**(दिनांक 06 जुन, 2022 रोजी पारित)**

**ज्याअर्थी** अर्जदार **श्रीमती मीना दिवाकर माकोडे रा. ब्रम्हपुरी तह. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर** हे सदयस्थितीत मौजा **खरबी** ता.ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपुर येथील प.ह.नं.4 , गट नंबर **70/1** आराजी **1.19** हे. आर. **पैकी 1.19** हे.आर जमा रुपये 2.90, भोगवटदार वर्ग-1 कृषक जमीन धारक आहे. ही जमीन वडीलोपार्जीत हक्काने प्राप्त झालेली असुन सदयस्थितीत अर्जदार हेच जमीनीचे मुळ मालक आहेत. अर्जदार यांनी **निवासी** प्रयोजनार्थ अकृषिक करण्याकरीता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम - 44 नुसार विहीत नमुन्यात या कार्यालयास दिनांक 09.06.2021 ला अर्ज सादर केल्यावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यांत येऊन प्रकरणांत कार्यवाही सुरु करण्यांत आली.

अर्जदार यांचे मौजा **खरबी** तहसील ब्रम्हपुरी येथील गट नंबर **70/1 आराजी 1.19 हे. आर. पैकी 1.19 हे.आर** भो.वर्ग-1 जमीनीचे **निवासी** प्रयोजनार्थ अकृषक परवानगी मिळण्याकरीता या कार्यालयास सादर केलेल्या अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयाकडुन दिनांक 14.06.2021 रोजी जाहिरनामा काढुन विहीत मुदतीत आक्षेप / हरकती मागविण्यांत आल्या. परंतु मुदतीमध्ये कोणाकडुनही आक्षेप किंवा हरकती प्राप्त झालेल्या नाहीत.

अर्जाचे अनुषंगाने खालील विभागाकडुन उपरोक्त कृषक जमीन निवासी प्रयोजनाकरीता अकृषक करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. 954 व 955 दिनांक 14.06.2021 अन्वये अभिप्राय / नाहरकत प्रमाणपत्र मागविण्यांत आले.

1. सहाय्यक संचालक, नगर रचना, चंद्रपुर
2. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपूर
3. कार्यकारी अभियंता, अऊदा बांधकाम विभाग म.रा.वि.पा.कं. मर्या. चंद्रपूर
4. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या. ब्रम्हपुरी
5. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.चंद्रपुर
6. उपजिल्हाधिकारी (पुर्नवसन) चंद्रपुर
7. उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, ब्रम्हपुरी
8. मंडळ अधिकारी , ब्रम्हपुरी / तलाठी साजा क्रं. 4 खेडमक्ता
9. सरपंच / सचिव ग्रामपंचायत माहेर ता.ब्रम्हपुरी

सहाय्यक संचालक नगर रचना, चंद्रपुर यांचे पत्र जा.क्र.अकृषी/अंतिम मंजुरी/मौ.खरबी/ ता.ब्रम्हपुरी/ससंनरचं/ 1300 दिनांक 31.05.2022 अन्वये अभिन्यासाला खालील अटी व शर्तीवर निवासी प्रयोजनाकरीता अंतीम मंजुरीची शिफारस केलेली आहे.

1. अभिन्यासातील खुली जागा करीता प्रस्तावित केलेल्या जागे व्यतिरीक्त संपूर्ण अभिन्यासातील भुखंडाचा उपयोग फक्त निवास वापराकरीताच करण्यात यावा.
2. भविष्यकाळात पुढे अभिन्यासातील भुखंडाचे विभाजन करु नये.
3. सार्वजनिक उपयोगाकरिता प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा वापर त्याच वापराकरीता करण्यात यावा.
4. अभिन्यासातील खुली जागा, रस्ते, लहान पुल, नाल्या, विद्युत व पिण्याचे पाण्याची व्यवस्था ईत्यादीचे अर्जदाराने 1 वर्षाच्या आत विकास करुन ते व्यवस्थापनाकरीता स्थानिक नियोजन प्राधिकरणास (ग्राम पंचायत **माहेर)** विधीवत हस्तांतरीत करावेत. तदनंतरच अभिन्यासातील भुखंड विकता येतील.

तहसिलदार ब्रम्हपुरी

5. अभिन्यासातील रस्ते, खुली जागा इत्यादी सार्वजनीक मालमत्ता म्हणून संबोधल्या जाईल व त्याचा उपयोग शेजाऱ्यांना अबाधित राहील.
6. अभिन्यासातील कोणत्याही भुखंडावर विकास / बांधकाम करतांना प्रादेशिक योजना क्षेत्राकरीता लागू असलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 च्या तरतुदी नुसार सक्षम अधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.
7. इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाचे नियमाचे पालन करावे.
8. विषयांकीत जागेत काही वृक्ष असल्यास, भुखंड आखतांना ती नष्ट न करता विदयमान स्थितीत कायम ठेवावी.
9. मंजुर अभिन्यासातील रस्त्याचे कडेला दोन्ही बाजुने प्रत्येकी 10.00 मी. अंतरावर वृक्षारोपण करावे.
10. उक्त नियमावलीतील तरतुद क्र. 3.6 नुसार महाराष्ट्र विद्युत वितरण विभागाकडून सदर प्रकरणी इलेक्ट्रीक सबस्टेशन (Electric Sub-Station) करीता भुखंड प्रस्तावित करणे आवश्यक राहील किंवा कसे याबाबतची खातरजमा करुन त्यानुसार योग्य स्थानावर किमान आवश्यक क्षेत्राचे भुखंड प्रस्तावित करणे आवश्यक राहील.
11. उक्त नियमावलितील तरतुद क्र. 13.4 नुसार विकासकर्ते यांनी सदर प्रकल्पाकरीता लागणारा Grey Water Treatment Plant (GWTP) चे क्षमताबाबत परिगणा व अंमलबजावणीचे विवरण अंतिम मंजूरीपुर्वी नियोजन प्राधिकरणाकडे सादर करणे आवश्यक राहील. तसेच प्रस्तावित अभिन्यासात Grey Water Treatment Plant करीता दर्शविलेल्याप्रमाणे भुखंडावर GWTP बांधून उक्त नियमावलितील तरतुद क्र. 13.4.1(iv) नुसार GWTP देखभाल करणे आवश्यक राहील.
12. उक्त नियमावलितील तरतुद क्र. 13.4.1(ii) नुसार सदर अभिन्यासातील जल व मल निसारण करीता Plumbing Line, Draining Line, Chambers हे वेगळया रंगाने दर्शवून Service Paln मंजूरी करीता नियोजन प्राधिकरणाकडे सादर करणे आवश्यक राहील.
13. विषयांकीत अभिन्यासाच्या हददी, मोजमापे, क्षेत्रफळ, मालकी हक्क याबाबत भविष्यात काही वाद उदभवल्यास त्यानुसार अर्जदार यांनी सुधारीत अभिन्यास मंजूर करणे बंधनकारक राहील.
14. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलितील तरतुद क्र. 2.7.2 नुसार अभिन्यासा अंतर्गतची करावयाची विकास कामे जसे रस्ते, गटारी, पाणीपुरवठा व्यवस्था, विदुयत दिवे व्यवस्था, खुल्या जागेचा विकास करणे विकासकास बंधनकारक राहील.
15. उक्त जागेच्या मालकीहक्काबाबतची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
16. सदरहू प्रकल्पाची महारेरा अधिनियम, 2016 अंतर्गत नोदंणी करणे अर्जदार / विकासक यांना बंधनकारक राहील.
17. विषयांकीत जागेतून विदयुत वाहिनी किंवा दुरध्वनी जात असेल तर ती रस्त्याच्या कडेल स्थानांतरीत केल्याशिवाय भुखंड विकू नये किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपूर यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक नाहप्र अकृषक/चंद्रपूर-18/रेचिशा/आरे-2021/4252 दिनांक 20.07.2021 अन्वये अर्जदारास मौजा **खरबी** तहसील ब्रम्हपुरी येथील गट नंबर **70/1** जागेस निवासी प्रयोजनार्थ अकृषक करण्यांस खालील अटीवर नाहरकत /अभिप्राय सादर केलेले आहे.

1. प्रस्तावित कृषक जमिनीस निवासी प्रयोजनार्थ अकृषक परवानगी मागितलेली आहे. त्याच प्रयोजनाकरीता जमिनीचा उपयोग करावा लागेल. अन्यथा नाहरकत रदद समजण्यात येईल.
2. रस्ते परिवहन महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि. 10.04.2003 चे निर्देशान्वये राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यापासून 75 मीटर अंतरापर्यंत कृषक जमीन अकृषक करण्यात येवू नये.

3. प्रस्तावित अकृषक जमिनीवरील बांधकामास महाराष्ट्र नगर विकास रचनेप्रमाणे विकास प्रस्तावित असल्यास संबंधीत असणाऱ्या इतर, राज्य/केंद्र शासनाच्या विभागाकडून किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेकडून परवानगी घेणे बंधनकारक राहील.
4. प्रस्तावित अकृषक जमिनीवरील बांधकामास इमारत रेषा / नियंत्रण रेषेचे नियम लागू राहतील.
5. राष्ट्रीय महामार्गालगत सर्व भूधारकास संयुक्तपणे मुख्य मार्गास नियमानुसार पोचमार्गाची रितसर परवानगी घ्यावी लागेल. तसेच राष्ट्रीय महामार्ग हददीबाहेर सेवा रस्त्याचे बांधकाम स्वखर्चाने करावे लागेल.
6. कोणत्याही प्रकारचे इमारत/इतर बांधकाम करतांना संबंधीत विभाग तसेच या विभागाकडून परवानगी घेणे बंधनकारक राहील.
7. राष्ट्रीय महामार्ग नियंत्रण (भूमी व वाहतुक) अधिनियम 2002 चे पालन करणे बंधनकारक राहील.
8. राष्ट्रीय महामार्गाच्या सरहददीत कोणत्याही प्रकारचे घाणपाणी, सांडपाणी किंवा पाण्याचा प्रवाह सोडता येणार नाही.
9. सदर जागा कुठल्याही पाटबंधारे प्रकल्पात येत नसल्याचे संबंधीत सक्षम विभागाचे नाहरकत प्राप्त करणे बंधनकारक राहील.
10. सदर जागा कुठल्याही शासकीय योजनेत भूअर्जन करण्याचे प्रस्तावित नसल्याची पडताळणी करण्याची जबाबदारी महसूल विभागाची राहील.
11. प्रस्तावासोबत जोडलेला कोणत्याही नकाशास मान्यता देण्यात आलेली नाही.
12. राष्ट्रीय कर्तव्य म्हणून प्लॉटच्या खाली जागेत (रिकाम्या जागेत) झाडे लावल्यास राष्ट्रीय कार्यात हातभार लावण्याचा स्तुत्य उपक्रम होवू शकतो.

मंडळ अधिकारी, ब्रम्हपुरी व तलाठी साजा क्रमांक 4 खेडमक्ता कुर्झा यांनी त्यांचे दिनांक 30.06.2021 रोजी दिलेल्या अहवालाप्रमाणे अर्जदारास मौजा **खरबी** तहसील ब्रम्हपुरी येथील गट नंबर **70/1 आराजी 1.19 हे. आर. पैकी 1.19** हे. आर. जमीन **निवासी** प्रयोजनार्थ अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपुर यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र.आरोग्य/ अकृषक/नाहप्र 238/2021 दिनांक 04.08.2021 अन्वये मौजा **खरबी** तहसील ब्रम्हपुरी येथील गट नंबर **70/1** जागेस **निवासी** प्रयोजनार्थ अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) चंद्रपुर यांचे कार्यालयीन पत्र क्र.कार्या-6/पुनर्वसन/क.लि./ अकृषक परवानगी/21/279 दिनांक 05.07.2021 तसेच भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी यांचे कार्यालयीन पत्र क्र.कावि/ उविअ/अ.का./भु.सं./2021/595 दिनांक 09.07.2021 अन्वये दिलेल्या अहवालानुसार मौजा **खरबी** तहसील ब्रम्हपुरी येथील गट नंबर **70/1** जागेस **निवासी** प्रयोजनार्थ अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

कार्यकारी अभियंता अऊदा प्रकल्प विभाग मराविपाकं.मर्या, चंद्रपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र. का.अ./अउदा/प्रकल्प/विभाग/चंद्र/तां/1373 दिनांक 29.07.2021 अन्वये अटी व शर्तीवर मौजा **खरबी** तहसील ब्रम्हपुरी येथील गट नंबर **70/1** जागेस **निवासी** प्रयोजनार्थ अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

कार्यकारी अभियंता मराविविकं मर्या., ब्रम्हपुरी यांना पत्र, स्मरणपत्र देऊनही त्यांचे अभिप्राय या कार्यालयास प्राप्त न झाल्याने त्यांची उक्त जागा अकृषक करण्यास काहीही हरकत नसल्याचे समजण्यात येत आहे.

सरपंच/सचिव ग्राम पंचायत माहेर यांनी त्यांचा अभिप्राय सादर केलेले असुन सोबत ठराव क्रमांक 06 दिनांक 28.06.2021 ची प्रत सादर केलेली असुन **निवासी** अकृषक परवानगीबाबत नाहरकत ठराव सादर केलेले आहे.

रा.मा.क्र.26/एन.ए.पी.34/2021-2022
मौजा:- **खरबी** तालुका:- **ब्रम्हपुरी**
**EQJ Court No. 00051/2022**

त्याअर्थी, **मी तहसीलदार, ब्रम्हपुरी** महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,1966 चे कलम-44 नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन अर्जदार **श्रीमती मीना दिवाकर माकोडे रा. ब्रम्हपुरी तह. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर** यांना त्यांचे मालकी व कब्जातील मौजा **खरबी** तहसील ब्रम्हपुरी येथील गट नंबर **70/1** आराजी **1.19** हे. आर. **पैकी 1.19 हे.आर** मोजणी मामला क्रं. 74/2022 दिनांक 27.04.2022 चे सिमांकीत मोजणी नकाशानुसार 11900.000 चौ. मि. कृषक जमीन **निवासी प्रयोजनार्थ अकृषक करण्यांस** खालील अटी व शर्तीस अधिन राहुन मान्यता देत आहे.

**AREA STATEMENT :**

| | | |
|---|---|---|
| 1 | AREA OF PLOT | |
| a | AS PER OWNERSHIP DOCUMENT (7/12, CTS extract) | 11900.000 SQ.MT. |
| b | AS PER MEASURMENT SHEET | 11900.000 SQ.MT. |
| c | AS PER SITE | 11900.000 SQ.MT. |
| 2 | DEDUCTION FOR | |
| a | PROPOSED D.P./D.P.ROAD WIDENING AREA/SERVICE ROAD/HIGHWAY WIDENING | 765.000 SQ.MT. |
| b | ANY RESERVATION AREA | 0.000 |
| | Total Deductions (a+b) | 765.000 SQ.MT. |
| 3 | BALANCE AREA OF PLOT (1-2) | 11135.000 SQ.MT. |
| 4 | AMINITY SPACE (IF APPLICABLE) | 1117.500 SQ.MT. |
| 5 | NET AREA OF PLOT (3-4) | 10017.500 SQ.MT. |
| 6 | RECREATIONAL OPEN SPACE (IF APPLICABLE) | 1114.420 SQ.MT. |
| 7 | INTERNAL ROAD AREA | 2441.424 SQ.MT. |
| 8 | SERVICE ROAD ANDHIGHWAY WIDENING | 0.000 |
| 9 | PLOTABLE AREA | 6461.656 SQ.MT. |

मौजा **खरबी** तहसील ब्रम्हपुरी येथील गट नंबर **70/1** आराजी 1.19 हे. आर. **पैकी 1.19 हे.आर** म्हणजेच 11900.00 चौ. मि. जागेमधील वर नमुद रस्त्याखालील आराजी 765.000 चौ.मि., 2441.424 चौ.मि. व मोकळी जागा 1114.420 चौ.मि. जागा वगळता निव्वळ 30 निवासी भुखंडा खालील आराजी 6461.656 चौ. मि. जागेवर व Amenity Plot 1117.500 चौ. मि.च्या जागेवर अकृषक व त्यावरील उपकराची आकारणी करण्यांत येत आहे.

**SCHEDULE OF PLOTS (As per layout plan) :**

| Sr.No. | Plot. No. | Area of each Plot in Sq. Mt. | Assessment Rs. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 1 | 988.353 | 49.00 |
| 2 | 2 | 223.000 | 11.00 |
| 3 | 3 | 227.250 | 11.00 |
| 4 | 4 | 228.250 | 11.00 |
| 5 | 5 | 225.500 | 11.00 |
| 6 | 6 | 249.200 | 12.00 |
| 7 | 7 | 231.500 | 12.00 |
| 8 | 8 | 200.000 | 10.00 |
| 9 | 9 | 200.000 | 10.00 |
| 10 | 10 | 200.000 | 10.00 |
| 11 | 11 | 200.000 | 10.00 |
| 12 | 12 | 220.950 | 11.00 |

रा.मा.क्र.26/एन.ए.पी.34/2021-2022
मौजा:- **खरबी** तालुका:- **ब्रम्हपुरी**
**EQJ Court No. 00051/2022**

| 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|
| 13 | 13 | 185.119 | 9.00 |
| 14 | 14 | 173.375 | 9.00 |
| 15 | 15 | 173.375 | 9.00 |
| 16 | 16 | 173.375 | 9.00 |
| 17 | 17 | 173.375 | 9.00 |
| 18 | 18 | 182.500 | 9.00 |
| 19 | 19 | 182.723 | 9.00 |
| 20 | 20 | 171.465 | 9.00 |
| 21 | 21 | 171.465 | 9.00 |
| 22 | 22 | 171.465 | 9.00 |
| 23 | 23 | 171.465 | 9.00 |
| 24 | 24 | 157.378 | 8.00 |
| 25 | 25 | 172.500 | 9.00 |
| 26 | 26 | 159.750 | 8.00 |
| 27 | 27 | 159.750 | 8.00 |
| 28 | 28 | 159.750 | 8.00 |
| 29 | 29 | 159.750 | 8.00 |
| 30 | 30 | 169.075 | 8.00 |
| **Total** | | 6461.656 | 324.00 |
| Aminity Plot No. 31 | | 1117.500 | 112.00 |
| **Grand Total** | | | 436.00 |

1. अकृषक दर (0.05 पैसे प्र.चौ.मि.प्रमाणे) :- रुपये 436/- प्रती वर्ष
   Aminity Plot (0.10 पैसे प्र.चौ.मि.प्रमाणे)
2. जि.प.कर (अकृषक कराचे 7 पट) :- रुपये 3052/- प्रती वर्ष
3. ग्रामपंचायत कर (अकृषक कराचे 1 पट ) :- रुपये 436/- प्रती वर्ष

-------------------------------

एकुण रुपये :- रुपये 3924/- प्रती वर्ष

-------------------------------

<u>अटी व शर्ती :-</u>

1. सहाय्यक संचालक नगर रचना, चंद्रपुर यांनी त्यांचे दिनांक 15/03/2022 व 31.05.2022 चे शिफारस पत्रात नमुद केलेल्या अटी व शर्ती अर्जदारास बंधनकारक राहतील.
2. आदेशाचे दिनांकापासुन एक वर्षाचे आंत जमीन भुपरावर्तीत करावयांस पाहिजे तसे न झाल्यास परवानगीची मुदत वाढवुन घेण्यांस या कार्यालयाकडे विनंती करावी. विनंती लेखी स्वरुपात असावी अन्यथा दिलेली परवानगी रद्द समजण्यांत येईल.
3. अनुग्राही यांनी निवासी अकृषक वापरास परवानगी मिळाल्याचे दिनांकापासुन दरसाल प्रचलीत रुपये 0.05 न.पै.प्रती चौ.मी.दराने आकारणी दरात वेळोवेळी अंमलात येणारा अकृषिक दर पुर्वलक्षी पध्दतीने जरी हमी कालावधी संपुष्टात आला नसला तरी लागु झाल्यास तो भरण्यांस बंधनकारक राहील तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 नुसार सुधारणा करण्यांस पात्र राहील.
4. अकृषीक आदेश मिळाल्यानंतर आदेशापासुन एक महिण्याचे आंत कलम 44 (6) अन्वये सनद कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रासह हजर राहावे. सनद कार्यान्वीत न केल्यास हा अकृषीक परवानगीचा आदेश रद्द करण्याची कार्यवाही करण्यांत येईल.
5. प्रकरणातील सर्व संबंधीत विभागाचे अभिप्राय/ नाहरकत प्रमाणपत्रा मधील अटी/शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

6. अभिन्यासातील सोडण्यांत आलेली रस्ते व खुली जागा (ओपन स्पेस) सहाय्यक संचालक नगर रचना, चंद्रपूर यांचे निर्देशाप्रमाणे कायम ठेवणे आवश्यक राहील.
7. सदर प्रकरणातील भुमापन क्रमांक **70/1** आराजी **1.19** हे. आर. **पैकी 1.19** हे. आर. चे अभिन्यासाचे निवासी भुखंडा खालील एकूण क्षेत्रफळ **6461.656** चौ.मी. आहे. सदर क्षेत्राच्या 10 **टक्के** क्षेत्र **646.165** चौ. मी. इतके होईल. **646.165 चौ.मी.** क्षेत्राचे भुखंड राखीव ठेवावयाचे झाल्यास भुखंड क्रमांक 4, 5 व 12 यांचे एकुण क्षेत्र 674.700 चौ. मी. वर्ग आहे. सदर अभिन्यासाच्या जागेवर रस्ता, विद्युत, पिण्याचे पाणी व सांडपण्याची व्यवस्था या किमान नागरी सुविधा जमिन मालकाने / विकासकाने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या सुविधा संबंधित अभिन्यासामध्ये उपलब्ध करुन दिल्याबाबत **तहसीलदार, ब्रम्हपुरी** कडून तपासणी करुन उपरोल्लेखीत भुखंड क्रमांक 4, 5 व 12 च्या विक्रीबाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. सदर नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दुय्यम निबंधकाद्वारे सदर भुखंडाच्या विक्रीची नोंद करण्यात येईल.
8. अभिन्यासाचे जागेतून विदयुत वाहिनी किंवा दुरध्वनी वाहिनी जात असेल तर ती रस्त्याच्या कडेला स्थानांतरीत केल्याशिवाय भुखंड विकू नये किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
9. शासन निर्णय क्र.ग्रा.पा.क्रं.1001/एक-330/प्र.क्र.7 दिनांक 14.2.2002 नुसार अभिन्यास क्षेत्रात पडणारे पावसाचे पाणी आणि घरगुती वापराचे पाणी जास्तीत जास्त प्रमाणात भुगर्भात जिरविण्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्यांत यावे.
10. सदर अभिन्यासातील कोणतीही जागा वाणिज्य / औद्योगिक / धार्मीक प्रयोजनासाठी वापरता येणार नाही.
11. सदर जागेबाबत न्यायालयात वाद असल्यास त्यास अर्जदार स्वतः जबाबदार राहील.

तहसीलदार ब्रम्हपुरी

स्वा/-
**तहसीलदार, ब्रम्हपुरी**

**<u>प्रतिलिपी : माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.</u>**

1. सहाय्यक संचालक, नगर रचना, मुल्यांकन, प्रशासकीय इमारत क्रं. 2, तळमजला, अ विंग, सिव्हील लाईन्स, नागपूर 440 001
2. उपअधिक्षक भुमी अभिलेख, **ब्रम्हपुरी** यांना वरप्रमाणे उचित कार्यवाहीस अग्रेषित. सोबत अभिन्यास जोडलेला आहे. अर्जदार **श्रीमती मीना दिवाकर माकोडे रा. ब्रम्हपुरी तह. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर** यांचे नांवाने कमी जास्त पत्रक तयार करुन पुढील कार्यवाहीकरिता या कार्यालयास सादर करावे.
3. सहाय्यक संचालक नगर रचना, चंद्रपूर यांना माहितीस अग्रेषित.
4. दुय्यम निंबधक **ब्रम्हपुरी** यांना उचित कार्यवाहीस अग्रेषित. आपणांस सुचित करण्यात येते की, आदेशातील सर्व अटीसह अट क्रमांक **7 चे** पालन होईल याची दक्षता घ्यावी.
5. तलाठी साजा क्रं. **4 खेडमक्ता ता. ब्रम्हपुरी** यांना उचित कार्यवाहीस अग्रेषित. सोबत अभिन्यास जोडलेला आहे.
6. ग्रामपंचायत **माहेर** ता. **ब्रम्हपुरी** यांनी खुली जागा व रस्ते हस्तांतरीत करुन घेण्याची कार्यवाही करावी.
7. व.बा.न. लिपीक तहसील कार्यालय, ब्रम्हपुरी यांनी सदर आदेशाची नोंद तालुका नमुना-2 मध्ये घेऊन त्याबाबतचा अहवाल सादर करावा.
8. **श्रीमती मीना दिवाकर माकोडे रा. ब्रम्हपुरी तह. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर** यांना माहितीस अग्रेषित.
9. कार्यालयीन प्रत.

तहसीलदार, ब्रम्हपुरी